


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २४३ वा शुक्रवार दि २१ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अर्पिताताई पूजाताई यांच्यात हायव्होल्टेज लढतीचा तुल्यबळ सामना...

## लक्ष्मीताई दत्ता काकस या पण सुध्दा आता रिंगणात.. तिरंगी लढत होणार

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रिकेटचा सामना असो की निवडणुकीचा, तुल्यबळ लढतीकडे नेहमीच सगळ्यांचे लक्ष लागून असते. बुलढाण्यात नगराध्यक्षपदासाठी सौ.पूजाताई संजय गायकवाड आणि सौ. अर्पिताताई विजयराज शिंदे यांच्यात जो हायव्होल्टेज सामना होणार आहे, त्यामुळे अत्यंत शांत व थंड हवेचे ठिकाण समजल्या जाणा-या बुलढाण्यात सध्या ऐन हिवाळ्यातही राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे दिसून येत आहे.या लढतीत आजी-माजी आमदारांचीच नाही तर दोन राजकीय पक्षांची प्रतिष्ठादेखील पणाला लागल्याचे दिसून येत आहे. पूजाताई असो की अर्पिताताई या दोघींच्याही मागे त्यांच्या पतिदेवांच्या कामाची पुण्याई आहे. मात्र आता या पुण्याईमध्ये नेमके कोणाचे पारडे जड ठरणार हे, निकालानंतरच सिद्ध होऊ शकेल. परंतु सध्या तरी अंदाजांचे वारे आणि आकडेमोडीची धुके संपूर्ण बुलढाणा शहरावर पसरल्याचे पहायला मिळत आहे. सर्वसाधारणफ्मुळे समीकरण झाले सोपे गेल्या सुमारे साडेतीन वर्षांपासून राज्यात नगरपालिकेच्या निवडणुका झाल्या नसल्याने अनेक इच्छुकांना अत्यंत दीर्घ कालावधीसाठी वाट पहावी लागली आहे. अखेर नाही म्हणता म्हणता मा.न्यायालयाच्या आदेशाने नगरपालिकेच्या निवडणुकांची नांदी सुरू झाली. यातच बुलढाणा नगराध्यक्ष सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाल्यामुळे राजकीय पक्षांकडून त्या प्रमाणे आपल्या खेळी खेळण्यास सुरवात केली.माजी आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे आणि विद्यमान शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांचे गेल्या अनेक वर्षांपासून अक्षरश:हाडवैर आहे. एकेकाळी जीवश्चकंठश्च मित्र असलेले हे दोघेही जण पक्के राजकीय वैरी बनले. प्रत्येक वेळी दोघेही एकमेकांच्या राजकीय जीवनात सातत्याने आडवे आलेले आहेत. अनेक वर्षांची ही परंपरा या निवडणुकीतदेखील कायम राहणार हे तर अगदीच स्पष्ट आहे. राज्यात जरी भाजप-शिवसेना हे महायुतीचे घटक असले आणि एकाच सरकारमध्ये सामिल असले, तरी सध्या भाजप-शिवसेनेत विळ्या-भोपळ्याचे सख्य असल्याचे दिसून येत आहे. दोन्हीकडून कार्यकर्त्यांची व नेत्यांची फोडाफोडी जोरात सुरू आहे.संजय गायकवाड व विजयराज शिंदे यांच्यातील अनेक वर्षांचे हाडवैर पाहता या ठिकाणी युतीला आधीच तडे गेले होते. अशातच दोघांनीह आपापल्या सुविद्य पत्नींसाठी आपल्या पक्षांकडून उमेदवारी मिळवली आणि युतीचा बुरुज बुलढाण्यात पुरता ढासळला.

-- **काय असतील समीकरणे?**

बुलढाणा जिल्ह्यात अनेक वर्षांपासून काँग्रेसचे वर्चस्व होते. ग्रामपंचायतींमपासून ते खासदारकीच्या जागेपर्यंत हे दिसत होते. असे असले तरी या ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून भाजपनेही आपली ठळक उपस्थिती दर्शवलेली आहे. शिवसेनेतील अंतर्गत गटबाजीमुळे माजी आमदार विजयराज शिंदे हे भाजपमध्ये आले आणि बुलढाणा भाजपमध्ये चैतन्याची लाट पसरली. विजयराज शिंदे हे कुशल संघटक आहेत आणि त्यांनी आधीपासूनच एकला चलो रेफ ची भूमिका कायम ठेवली. शिंदे भाजपमध्ये आल्यापासून त्यांनी बुलढाणा शहरासह जिल्हाभरात संगठन बांधणी मजबूत केली. शहरातही त्यांनी कार्यकर्त्यांची फळी उभी केली. आमदार झाल्यानंतर संजय गायकवाड यांनी शहरात विकास कामे व सुशोभीकरणाची कामे केली. त्यांच्या विकासाचा आलेख सतत चढत असतो.असे असले तरी बुलढाणा शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य अनेक वर्षांपासून राहिलेले आहे. संघाचा मोठा चाहता वर्ग बुलढाण्यात आले. बुलढाण्यातील अनेक भाग हे त्यामुळेच भाजपचे गड बनले आहेत. एक मोठा भाजप समर्थक मतदार बुलढाण्यात आले. त्याचा नक्कीच लाभ अर्पिताताई यांना होण्याची शक्यता आहे. यामुळेच अर्पिताताई यांचे पारडे कुठेतरी जड होण्याची चिन्हे दिसत आहेत.



-- **लक्ष्मीताईंमुळे समीकरण बनले रंजक**

बुलढाण्यातील लढत यंदा दुरंगी नसून तिरंगी आहे. काँग्रेस आणि महाविकास आघाडीकडून लक्ष्मीताई दत्ता काकस यांचाही अर्ज असल्यामुळे मतविभाजन होणार हे निश्चित आहे. आता हे मतविभाज नेमके कोणाच्या पथ्थ्यावर पडणार हे महत्वाचे आहे. काँग्रेसला शहरातील दलित-मुस्लिम मतदान मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता दिसून येत आहे. मतविभागणी होत असली तरी भाजपचा मतदार हा साधारणत: कधी इकडे-तिकडे आणि आजूबाजूला जात नसल्या कारणाने तो एकसंध राहतो हा आजवरचा अनुभव आहे. नेमकी हीच बाब भाजपच्या उमेदवाराच्या पथ्थ्यावर पडण्याची शक्यता आहे. या विधानसभा निवडणुकीतही बुलढाणा शहरातून गायकवाड यांच्या पारड्यात मते कमीच पडली होती. त्यामुळे या निवडणुकीचा एकंदर ट्रेंड लक्षात येण्यास सूज्ञ नागरिकांना काही सांगण्याची गरज नाही.

# राज्यात सत्ता नसातानाही जिथं कायम कमळाला साथ मिळाली तिथूनचं भाजपची माघार

**वृत्तसंस्था/ परभणी**

परभणी: जिल्ह्यातील सातही नगरपालिकांमध्ये स्वबळावर निवडणूक लढण्याची भाजपकडून घोषणा करण्यात आली होती. तशा पद्धतीने तयारी देखील करण्यात आली होती, पण ऐनवेळी पाथरी नगरपालिकेच्या निवडणुकीमधून भाजपने माघार घेतली. भाजपच्या इच्छुक उमेदवारांनी पाथरी नगरपालिकेसाठी नगराध्यक्षासह नगरसेवक पदांसाठी उमेदवारी अर्ज देखील दाखल केले. पण एबी फॉर्म न मिळाल्याने त्यांच्या उमेदवाऱ्या रद्द झाल्या. त्यामुळे भाजपमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. काल पक्षनिरीक्षकासमोरच भाजप जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांचा तात्काळ राजीनामा घेण्याची मागणी या भाजप पदाधिकाऱ्यांनी केली आहे. त्यामुळे जिल्ह्यामध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. याविषयी विस्तृत माहिती अशी की , परभणी जिल्ह्यातील सात नगरपालिकांच्या निवडणुका सध्या सुरू आहेत. या निवडणुकीची तयारी भाजपकडून मागील बऱ्याच महिन्यांपासून करण्यात येत होती. सर्वच नगरपालिकांमध्ये भाजप स्वबळावर लढणार असल्याचे सांगण्यात येत होते, आणि तशा पद्धतीने तयारी देखील करण्यात आली होती. त्यामुळे पाथरी नगरपालिका हद्दीतील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नगरपालिका निवडणूक स्वबळवर लढण्याच्या उद्देशाने सर्वच तयारी केली होती. राज्यात आणि केंद्रात भाजपचं सरकार आहे त्याचबरोबर परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री या भाजपच्याच मेघना बोर्डीकर आहेत. त्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये चांगलाच उत्साह देखील होता. त्या अनुषंगाने भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी पाथरी नगरपालिकेसाठी नगराध्यक्षासह नगरसेवक पदांसाठी सर्वांनीच भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल केले. पण उमेदवारी अर्ज दाखल करताना एबी फॉर्म जोडण्यात आले नव्हते. त्यानंतर स्थानिक इच्छुक उमेदवारांनी भाजपा




जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांच्याकडे एबी फॉर्मची मागणी केली. पण शेवटपर्यंत सुरेश भुमरे यांनी एबी फॉर्म दिलेच नाहीत. आणि त्यामुळे भाजपच्या सर्वच उमेदवारांचे उमेदवारी अर्ज बाद झाले. उमेदवारी अर्ज बाद झाल्यानंतर मात्र पाथरी तालुक्यात भाजपमध्ये प्रचंड असंतोष उभारून आला आहे. निवडणुकीची संपूर्ण तयारी केली असताना वाजत गाजत उमेदवारी अर्ज देखील दाखल केले असताना ऐनवेळी एबी फॉर्म न दिल्याने पक्षामध्ये प्रचंड नाराजी वाढली आहे.

# खड्ड्यांप्रति सहानुभूतीने वागावे...



हे दिवस पावसाळ्याचे आहेत... आतल्या खाचखळग्यांनी खड्डे होण्याचे आहेत. खड्ड्यांचा दिवस असतो. खड्ड्यांचा मौसम असतो. काही खड्डे बारमाही असतात. काही प्राचीन-पुरातन. सार्वजनिक बांधकाम की तत्सम कोणत्याही विभागाने या खड्ड्यांच्या वाट्याला जायचे नसते. खड्डा कोणताही असो, त्याला पुरातत्त्व विभागाचे संरक्षण असते. परवानगीशिवाय अशा खड्ड्यांची डागडुजी करता येत नाही आणि ही प्रक्रिया अतिशय किचकट असल्याने, तसेच ती कशी करावी याविषयीच्या पुरेशा माहितीचा अभाव असल्याने या खड्ड्यांचे पुरातनरूप कायम राहते. खड्ड्यांच्या जिवात जीव राहतो. बारमाही खड्ड्यांच्या वाट्याला डागडुजी येते. ती नको यायला, पण येते. ती नेमकी केव्हा येईल, याचा नेम नसतो. नेम कुणाचा कुणावर असतो. उघड असतो. आडून असतो. जीआर आला डागडुजीचा की कामाला हळूच सुरुवात होते. हा हळुवारपणा पावसावरच्या कवितेपेक्षाही नाजूक आणि नितळ असतो. इतका नाजूक की, दोन खड्डे बुजवले की तीन खड्डे बुजवण्याविनाच सोडायचे... इतके नाजूक मन. हळवेच मन ते. मनाचे ऐकणार नाही तर कोणाचे ऐकणार! काही खड्डे बुजले, काही सुटले की काय होते? बुजलेला खड्डा हा न बुजलेल्या खड्ड्याकडे बघतो. न बुजलेला खड्डा बुजलेल्या खड्ड्याकडे बघतो. दोघेही एकमेकांकडे बघतात. या बघण्यात, या नजरेत आपुलकी असते. एकमेकांविषयीची काळजी असते. हा काळजीचा सूर खड्ड्यातून जाणाऱ्या वाहनाचालकाच्या तोंडून निघतो, आह!फ हा झटका वाहनचालकाला बसतो; पण तो सूर असतो त्या बुजलेल्या खड्ड्याचा. आंतरिक स्वर असतो. मनाची व्यथा असते. दु:ख नि वेदना असते. एकच सवाल असतो, ङ्का बुजवले मला? आह!! का बुजवले मला?फ अस्तित्वाचा विषय तो हा. अस्तित्व धोक्यात येत असेल तर आक्रोश होणारच! काही खड्डे मौसमी असतात. हंगामी. पावसाळा हा या अशा खड्ड्यांच्या बहराचा सीझन असतो. जिकडे तिकडे चोहीकडे खड्डे उगवतात. म्हणजे दिसतात. पाऊसधारा त्यांना जगाचे दर्शन करवतात. जगाला त्यांचे. मुंबई ते गोवा. का त्यांनी एका थराच्या आत इतके दिवस दडून बसावे. पावसाने यावे आणि त्यांना मोकळे करावे. घुसमट दूर करावी. त्यांना वाहनांशी लपाछपीचा खेळ खेळता यावा. हक्काचा आनंद लुटता यावा. खड्डा आणि वाहन ही भेटगाठ तर अंतरीची. आनंदाची. यात आनंद काय, असा प्रश्न कृपया विचारू नये. प्रत्येक गोष्टीत वेदना शोधायची नसते. ही सवय चांगली नाही. सदैव आनंदी राहायला हवे. आनंदाचा शोध महत्त्वाचा. वेदनेतही आनंदाचा शोध. असे किती खड्डे असतात, एखाद्या रोडवर. दोन-चार-पाच-पन्नास. फार तर शंभर. का असू नये त्यांनी! त्यांचा अधिकार आहे तो आणि या अधिकाराचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांची आहे. या जबाबदारीपासून आपल्याला पळ काढता येणार नाही. खड्ड्यांचा दोष नसतोच मुळात. दोष माणसांचा असतो, जे त्यांना ओळखत नाहीत. त्यांचे महत्त्व जाणत नाहीत. खड्ड्यांवर काही माणसांचे बारमाही पोट असते, हे वास्तव आपण का ओळखत नाही. रोडरोलर आधुनिक झाले असले तरी खड्डे आधुनिक होता कामा नयेत. खड्ड्यांनी खड्ड्यांसारखे राहावे. स्वत:चे मूलतत्त्व हरवू नये. रस्ता डांबरी वा सिमेंटचा, मेकिंग काहीही असले तरी खड्डा हा खड्डा असतो. आपण हे भान ठेवले पाहिजे. भावना जाणून घेतल्या पाहिजे. आपल्या भावनांना बगल देण्याचा मोठेपणा प्रसंगी आपण दाखवला पाहिजे. माणसाने माणसाने खड्ड्यांप्रति सहानुभूतीने वागावे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# हा रडणारा नाही तर लढणारा एकनाथ शिंदे’

## अमित शाह यांच्या भेटीनंतर शिंदेंची दिल्लीत पहिली प्रतिक्रिया..

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्लीत जावून भेट घेतली. एकनाथ शिंदे हे महायुतीमधील कुरघोडीच्या घटनांवरुन नाराज आहेत. त्यांनी अमित शाह यांच्याकडे तक्रारींचा पाढा वाचल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली होती. पण या सर्व वृत्तांचं एकनाथ शिंदे यांनी खंडन केलं आहे. आपण बिहार निवडणुकीत झालेल्या विजयानंतर अमित शाह यांचं अभिनंदन करण्यासाठी भेटीसाठी आलो, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. यावेळी एकनाथ शिंदे यांना त्यांच्या नाराजीचा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी आपण रडणारे नाहीत तर लढणारो आहोत, असं एकनाथ शिंदे म्हणाले.बिहारचं सरकार स्थापन होत आहे. बिहारच्या मुख्यमंत्र्यांच्या आणि मंत्रिमंडळाच्या शपथविधीचं मलाही निमंत्रण आहे. त्यामुळे मी दिल्लीहून बिहारला निघणार आहे. म्हणून मी बिहारच्या यशाचं अभिनंदन करावं म्हणून गृहमंत्री अमित शाह यांना भेटलो. अतिशय चांगली चर्चा झाली. त्यांचं अभिनंदन केलं. बिहारमध्ये एनडीएला मोठा विजय मिळाला. त्यामुळे एनडीएचा घटकपक्ष म्हणून शिवसेनेलादेखील आनंद आहे. त्यामुळे जाता-जाता अमित शाह यांना भेटणं, त्यांचं अभिनंदन करणं आणि शुभेच्छा देणं हे झालं‘, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.मी तक्रारींचा पाढा वाचणारा, रडणारा एकनाथ शिंदे नाहीय. हा रडणारा नाही तर लढणारा एकनाथ शिंदे आहे. तुम्ही हे वेळोवेळी पाहिलं आहे. त्यामुळे यात छोट्यामोठ्या तक्रारी आम्ही राष्ट्रीय पातळीवर आणत नसतो‘, अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी मांडली.नाराजी वगैरे हे सगळं तुमचा कल्पनाविलास आहे. हे सगळं तुम्ही पतंग उडवत असतात. मी आतमध्ये बसलो आहे आणि तुमच्या बाहेर बातम्या सुरु आहे. मी एवढंच सांगतो की, ज्या नगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर आणण्याचा विषय नसतो. त्यामुळे काल आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा केली.



त्यामधून एवढंच ठरलं की, महायुतीला कुठेही गालबोट लागणार नाही, मतभेद होणार नाही, याची काळजी प्रत्येक पक्षाने घेतली पाहिजे. याबाबत प्रत्येक पक्षाच्या प्रमुखाने सूचना दिल्या पाहिजेत‘, असं मत शिंदे यांनी मांडलं. नाराजीचा विषय नव्हताच. तो विषय महाराष्ट्र आणि राष्ट्रीय पातळीवरचा आहे. स्थानिक पातळीवरचा होता. तो राष्ट्रीय पातळीवरचा विषय नव्हता. तो विषय काल संपला आहे. त्या विषयाला मी एवढ्या गांभीर्याने घेत नाही आणि घेणारही नाही‘, अशीदेखील प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.

‘बिहारमध्ये एनडीएमध्ये पाच पक्ष एकत्र होते. पाच पक्षांच्या एकजुटीमुळे प्रचंड मोठं यश एनडीएला मिळालं. बिहारच्या जनतेला पूर्वीचं जंगलराज नको होतं. त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील विकास राज हवं होतं. मोदींच्या नेतृत्वात ही निवडणूक लढवली. त्यांच्यावर विश्वास ठेवला. नितीश कुमार यांनी पूर्वीचा काळ बदलला. त्यामुळे एकजुटीने लढतो तेव्हा यश नक्की येतो. आपण महाराष्ट्रातही एकजुटीची ताकद पाहिली‘, असंही शिंदे म्हणाले.



# शाह आणि फडणवीस यांच्यात कोल्डवॉर सुरु

## सुषमा अंधारे यांचा धक्कादायक दावा..



**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पडद्यामागे प्रचंड घडामोडी सुरु आहेत. महायुतीत सध्याच्या घडीला सारं काही आलबेल आहे, असं म्हणता येणार नाही. कारण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाराजी समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाच्या माजी नगरसेवकांना भाजपने प्रवेश दिला. विशेष म्हणजे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजपने शिवसेनेच्या अनेक पदाधिकाऱ्यांना आपल्या पक्षात प्रवेश दिला आहे. तसेच शिंदेंच्या मंत्र्यांनी विधानसभा निवडणुकीत ज्यांचा पराभव केला त्यांना पक्षात घेऊन भाजपने त्यांना ताकद दिली. त्यामुळे नाराज एकनाथ शिंदे आज थेट दिल्लीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीला गेले.एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांच्यात जवळपास तासभर चर्चा झाली. या चर्चेत एकनाथ शिंदे यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची तक्रार केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. रवींद्र चव्हाण पैसे देवून माजी नगरसेवक फोडत असल्याचा आरोपही एकनाथ शिंदेंनी आपल्या तक्रारी केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या घडामोडींवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी धक्कादायक दावा केला आहे.अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातीस कोल्डवॉर लपून राहिलेला नाही. त्यामुळे अमित शाह यांच्या जवळचा जो असतो तो देवेंद्र फडणवीस यांच्या रडारवर असतो. तसेच जो देवेंद्र फडणवीस यांच्या रडारवर असतो तो अमित शाह यांना फार प्रिय असतो. त्यामुळेच रवींद्र चव्हाण यांनी आमची माणसं फोडली असतील तर याची दाद कुणाकडे मागायची म्हणून कदाचित एकनाथ शिंदे त्यांच्याकडे जात असतील‘, असं सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत.उपमुख्यमंत्रीपदाची महत्त्वकांक्षा असणारे उदय सामंत आपल्या जवळचा गट घेऊन कदाचित भाजपसोबत जातीलच. काय प्रोब्लेम आहे? कारण आता संदीपान भुमरे, संजय शिरसाट, दादा भुसे, भरत आप्रकारे त्रस्त झालेली आहेत. निश्चितपणे या सगळ्यांचा शिंदे यांच्यापेक्षा उदय सामंत यांच्याकडे कल जास्त आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातल जो रंजकपट २०२२ ला शिंदेंनी नाटकाचा पहिला अंक दाखवला होता, त्याचा दुसरा अंक आता सुरु आहे‘, असादेखील दावा सुषमा अंधारे यांनी केला.एकनाथ शिंदे यांचं भाजपसोबत येणं आणि सरकार स्थापन करणं या सगळ्या गोष्टींचे शिल्पकार अमित शाह आहेत.

# ठाकरे बंधूंना सोबत घ्यायचं की स्वतंत्र?

## मुंबईत मोठा निर्णय होणार, काँग्रेस नेते शरद पवारांच्या भेटीला..

**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेश चेन्नीथला यांनी मुंबईत काँग्रेस स्वतंत्र लढणार असल्याची घोषणा गेल्या आठवड्यात केली होती. यानंतर आज महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. मुंबई काँग्रेसच्या नेत्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी काँग्रेस नेत्यांनी मुंबईत एकत्र निवडणूक लढवण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.




शरद पवार यांच्या पक्षासोबत काँग्रेसची नैसर्गिक युती आहे. त्यामुळे मुंबई महापालिका निवडणूक एकत्र लढण्याचा काँग्रेसचा मानस आहे. दरम्यान, शरद पवारांच्या भेटीनंतर काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी ठाकरे बंधूंच्या प्रश्नावर आक्रमक प्रतिक्रिया दिली.आमची आज खूप चांगली चर्चा झाली. आमची नैसर्गिक आघाडी आहे. सगळे जण आम्ही संविधानाचा धागा मानतो. आम्ही लोकशाही मानतो. या देशामध्ये समत, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य असलं पाहिजे. मुंबईची एकता अबाधित राहिली पाहिजे. मुंबईच्या विषयावर येत्या काळात निवडणूक झाली पाहिजे, अशी भूमिका आम्ही मांडली.

आमची त्याबाबत चर्चा झाली‘, अशी माहिती वर्षा गायकवाड यांनी दिली.मागील काळात दोन महिन्यांपूर्वी संजय राऊत यांनी सांगितलं होतं की, महाविकास आघाडी नाही झाली तरी आम्ही इकटे निवडणुकीला सामोरं जाऊ. आम्ही स्वत:च्या ताकदीवर निवडणूक लढवू. कारण स्थानिक स्वकराज्य संस्थाची निवडणूक आहे. आम्ही एकटे जावू शकतो ही भूमिका त्यांनी मांडली होती. दोन भाऊ एकत्र आल्या तर आम च्या शुभेच्छा आहेत. दरम्यान, आगामी मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपाचा फॉर्म्युला ठरवण्यासाठी चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये जागावाटपाबाबत प्राथमिक चर्चा झाली आहे. शिवसेना उबाठा पक्ष मनसेसाठी मुंबईत ७० जागा देण्यास तयार असल्याची माहिती समोर येत आहे. पण मनसेकडून १२५ प्रभागांची यादी मनसेकडून तयार असल्याची सूत्रांची माहिती आहे. दोन्ही ठाकरे बंधूंमध्ये याबाबत तोडगा काढण्यात येण्याची शक्यता आहे.

# मुलाकडून चुकीचे शब्द, मी अजितदादांची माफी मागतो..

**सोलापूर :** बाळराजे पाटील यांनी काल नगरपंचायत निवडणुकीवरून थेट राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा एकेरी उल्लेख करत ओपन चॅलेंज दिलं. ‘अजित पवार...सगळ्यांचा नाद करायचा, पण अनगरकरांचा नाद नाही करायचा,‘ असं वक्तव्य बाळराजे ऊर्फ विक्रांत पाटील यांनी केलं होतं. माजी आमदार राजन पाटील यांचे पुत्र असलेल्या बाळराजे पाटलांनी केलेल्या या वक्तव्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या. अखेर आज राजन पाटील यांनी पत्रकार परिषद घेत मुलाच्या वक्तव्यावरून माफी मागत अजित पवारांनी त्याला पदरात घ्यावं, अशी विनंती केली आहे.राजन पाटील म्हणाले की, ‘अनगरमध्ये आजपर्यंत कधीही निवडणूक झालेली नाही. मात्र यंदा पहिल्यांदाच निवडणूक होणार असल्याने तरुण मुलं उत्साहात होती. हा उत्साह तरुणांनी साजरा करण्याचा प्रयत्न केला. यावेळी आमच्या मुलानं तिथं जे वक्तव्य केलं मी त्याचं समर्थन करू शकत नाही. माझा मुलगा राजकारणाच्या दृष्टीने लहान आहे. त्यांच्या तोंडून नकळत अशा प्रकारचं वक्तव्य गेलं असल्याने त्याचा वडील म्हणून मी पाटील परिवाराच्या वतीने मी दिलगिरी व्यक्त करतो, क्षमा मागतो.‘बाळराजे पाटील यांनी अनगर नगरपंचायत निवडणुकीवरून अजित पवारांशी पंगा घेतल्यानंतर स्पष्टीकरण देताना आज राजन पाटील म्हणाले की, ‘मोठे पवारसाहेब आणि अजितदादांपासून मी आज जरी बाजूला गेलो असलो तरी या गोष्टीला अजितदादा कारणीभूत आहेत, असं मी समजणार नाही. मी बाजूला जाण्याला अनेक कारणं आहेत.



# जीव देण्याची धमकीही क्रूरताच!

## विभक्त पत्नीला २५ लाख आणि दोन फ्लॅट्स देण्याचे आदेश..

**मुंबई :** 'आत्महत्या करण्याची सातत्याने धमकी देणे म्हणजे क्रूरता आहे. कौटुंबिक संबंधांत पत्नी किंवा पतीने अशाप्रकारे वारंवार वर्तन केले, तर जोडीदाराला सोबत राहणे व वैवाहिक संबंध पुढे नेणे मुश्कील होते', असे महत्त्वाचे निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणात पतीला नुकताच घटस्फोट मंजूर केला.संबंधित दाम्पत्य २००६ मध्ये विवाह झाल्यानंतर २०१२ पर्यंत एकत्र राहत होते. मात्र, त्यानंतर ते विभक्त राहू लागले. कौटुंबिक न्यायालयाने २०१९ मध्ये पतीची घटस्फोटाची याचिका फ `टाळल्याने त्याने त्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.



याविषयीच्या सुनावणीअंती मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर व न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठाने पतीची याचिका मान्य केली. मात्र, घटस्फोट मंजूर करताना अंतिम तडजोड म्हणून विभक्त पत्नीला २५ लाख रुपये आणि दोन सदनिका तिच्या नावे करून देण्याचे निर्देश खंडपीठाने पतीला दिले.पत्नीने सोडचिठ्ठी देणे, संशय घेणे तसेच आत्महत्या करण्याची धमकी देणे आणि तसा प्रयत्न करणे, ही हिंदू विवाह कायद्यानुसार घटस्फोट मिळण्यासाठी पुरेशी कारणे आहेत' असा युक्तिवाद पतीतर्फे मांडण्यात आला होता. तो खंडपीठाने ग्राह्य धरला.'हे जोडपे गेल्या एक दशकाहून अधिक काळापासून वेगळे राहत आहे.

त्यांच्यात समेट होणे शक्य दिसत नाही. शिवाय पतीने क्रूरतेच्या अनेक घटना निदर्शनास आणल्या. त्यांचा विचार कौटुंबिक न्यायालयाने केल्याचे दिसत नाही. जोडीदाराकडून आत्महत्येची धमकी मिळत राहणे, हे 'क्रूरता' असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे.

'या प्रकरणात संशय घेण्याचे आणि कथितरीत्या आत्महत्येचा प्रयत्न करण्याचे प्रकार पत्नीचे पतीप्रति असलेले वर्तन दर्शवते', असे निरीक्षण खंडपीठाने आपल्या निर्णयात नोंदवले.याआधी, क्रूरता आणि देखभाल खर्च न दिल्याचा आरोप करत महिलेने कोर्टात दरमहा २५००० रुपये पोटगीची मागणी केली होती. मात्र पतीच्या दाव्यानुसार पत्नी डॉक्टर असून दरमहा ४५००० रुपये कमावत असल्याने तिला पोटगी देण्याची गरज नाही. या प्रकरणी ट्रायल कोर्टाने पत्नीची याचिका फेटाळली होती, परंतु मध्य प्रदेश हायकोर्टाने पतीला दरमहा १५,००० रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले होते.

## तरुण व्यावसायिकावर गोळीबार, दोन-तीन राऊंड फायर



**मुंबई :** मुंबईसह पुणे, ठाणे या शहरात बिल्डर्सची संख्या वाढत असून बांधकाम क्षेत्रातील कोट्यवधींची उलाढाल गुन्हेगारीला प्रवृत्त करताना दिसून येते. त्यातून, धमक्या, खून, अपहरणासारखे गंभीर गुन्हे घडत आहेत. आता, पुन्हा एकदा मुंबईत एका बांधकाम व्यवसायिकावर दिवसाढवळ्या गोळ्या झाडल्याचा धक्कादायक घटना समोर आली आहे. मुंबईच्या कांदिवली चारकोप परिसरात भरदिवसा फ्रेंडी दिलीमा भाई नावाच्या व्यावसायिकावर गोळीबार करण्यात आला. अज्ञाताकडून फ्रेंडी दिलीमा भाईवर २ ते ३ राऊंड फायर करण्यात आले असून गोळीबारात फ्रेंडी दिलीमा भाई गंभीर जखमी झाला आहे.कांदिवली चारकोप परिसरात बंदर पाखाडी येथे पेट्रोल पंपासमोर अज्ञाताकडून फ्रेंडी दिलीमा भाई या व्यवसायिकावर गोळीबार करण्यात आला. फ्रेंडीभाई हा तरुण बांधकाम व्यावसायिक आहे, ते कारमध्ये बसले असताना दोघांकडून त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. यावेळी, अज्ञातांनी २ ते ३ राउंड फायर केले, त्यामध्ये दिलीमा भाईच्या पोटात दोन गोळ्या घुसल्या असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.गोळीबारानंतर अज्ञात तरुण घटनास्थळावरून फरार झाले आहेत. जखमी तरुणाला बोरिवली येथील ऑस्कर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दरम्यान, गोळीबारच्या घटनेनंतर चारकोप पोलीस आणि डीसीपी तात्काळ घटनास्थळी पोहोचले असून वेगवेगळ्या परिसरात असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा तपासून आरोपीचे शोध घेत आहेत. तर, फॉरेन्सिक टीमही घटनास्थळी दाखल झाली आहे. मात्र, मुंबई शहरात भरदिवसा गोळीबाराची घटना घडल्यामुळे परिसरात, लोकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे.

## आईने नऊ महिन्यांच्या चिमुकलीला हाताने संपवलं..

**जयपूर :** पोटच्या नऊ महिन्यांच्या मुलीची गळा आवळून हत्या करणाऱ्या एका निर्दयी आईला पोलिसांनी अटक केली आहे. यावेळी आईने लेकीला संपवल्याचं जे कारण सांगितलं, ते ऐकून पोलिसही हैराण झाले. राजस्थानमधील खैरथल-तिजारा जिल्ह्यातील किशनगढबास येथे ही भयंकर घटना उघडकीस आली आहे. यावेळी आरोपी आईने पोलिसांना सांगितलं की, तिच्या सासरच्या लोकांनी तिच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि आरोप केला की ते मूल त्यांच्या मुलाचे नाही. यावरुन ते दररोज तिला टोमणे मारत असत. यासर्वांमुळे हताश झालेल्या तिने अखेर आपल्या मुलीची आपल्याच हाताने हत्या केली. सध्या पोलिस या महिलेची चौकशी करत आहेत.१६ नोव्हेंबर रोजी खैरथल तिजारा जिल्ह्यातील किशनगढ बास येथे ९ महिन्यांच्या मुलीच्या हत्येचा एक भयंकर प्रकार उघडकीस आला होता. जफरउद्दीन नावाच्या एका व्यक्तीने किशनगढ बास पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. ज्यामध्ये रुनिजा नावाच्या महिलेने तिच्या ९ महिन्यांच्या मुलीचा गळा दाबून खून केल्याचा आरोप करण्यात आला होता. ९ महिन्यांची मुलगी अक्सचा मृतदेह खोलीत एका खाटेवर पडलेला आढळून आला. पोलिसांनी याप्रकरणी एफआयआर नोंदवून तपास सुरू केला आहे.त्यानंतर तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. तर या प्रकरणात पोलिसांनी अक्सची आई रुनिजा हिला अटक केली आहे.

## शाळेत यायला उशीर; चिमुकलीला उठाबशांची शिक्षा, रुग्णालयात विद्यार्थिनीचा मृत्यू

**पालघर :** वसईत काही दिवसांपूर्वी एका १३ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी शिक्षिका ममता यादव हिच्यावर वालीव पोलिसांनी बीएनएस ३०४ अन्वये गुन्हा दाखल करुन आज अटक केली आहे. शाळेत यायला १० मिनिटं उशीर झाला म्हणून त्या शिक्षकेने अक्षरशः शंभर उठाबशा काढायला लावल्याचा आरोप मृत मुलगी अंशिका गौडच्या पालकांनी केला होता. उपचारादरम्यान १४ नोव्हेंबर रोजी त्या विद्यार्थीनीचा मृत्यू झाल्यानं कुटुंबीयांना संताप व्यक्त केला. याप्रकरणी शाळा प्रशासनाने शिक्षिकेला निलंबित केलं होतं. तर ती शाळा अनधिकृत असल्याचाही उघड झालं होतं. आता, शिक्षिकेविरुद्ध मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा आरोप ठेवत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शाळेमध्ये पोहचण्यासाठी १० मिनिटे उशीर झाल्याचा राग शिक्षिकेला आला. राग अनावर झालेल्या शिक्षिकेने विद्यार्थिनीला १०० उठाबशा काढण्याची भयावह शिक्षा ठोठावली. या जीवापेक्षा मोठ्या शिक्षेमुळे विद्यार्थीनीची तब्येतच बिघडली व तिला रुग्णालयात दाखल कराव लागलं, पण दुर्दैवाने उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. ही संतापजनक घटना वसई पश्चिममधील सातीवली परिसरातल्या श्री हनुमंत विद्या हायस्कूलमध्ये घडली.मिळालेल्या माहितीनुसार, या विद्यार्थीनीचं नाव अंशिका गौड आहे. ती फक्त




१३ वर्षांची होती आणि सहावीत शिकत होती. ८ नोव्हेंबर रोजी अंशिका नेहमीप्रमाणे शाळेमध्ये पोहोचली. पण तिला १० मिनिटं उशिर झाला होता. याच कारणाने शिक्षिकेने अंशिकासह इतर उशीर झालेल्या विद्यार्थ्यांना वर्गाच्या बाहेर काढलं व उठाबशांची शिक्षा सुनावली. घाबरुन गेलेल्या अंशिकानं सर्व १०० उठाबशा काढल्या. यातच तिची तब्येत बिघडली. दुसऱ्याच दिवशी तिला वसईमधल्या आस्था हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं. याठिकाणाहून तिला मुंबईमध्ये हलवण्यात आलं कारण तिची तब्येत नाजूक झाली होती. पण शेवटी नको तेच घडलं आणि बालदिनालाच अंशिकाने प्राण सोडले.दरम्यान, हा प्रकार समोर आल्यानंतर मनसेने शाळेविरोधात तीव्र भूमिका घेत शाळेला टाळं ठोकलं आहे. शिक्षिकेवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय शाळा उघडू देणार नाही, असा इशाला मनसेने दिला होता.

## सख्ख्या मामानं १६ वर्षीय भाचीला मुंबई लोकलमधून ढकललं..

**पालघर :** धावत्या लोकल ट्रेनमधून ढकलून अल्पवयीन भाचीची मामानेच हत्या केल्याची धक्कादायक घटना वसई परिसरात उघडकीस आली आहे. मामा आणि अल्पवयीन भाचीचे प्रेमसंबंध होते, भाची आपल्याला ओझे होईल या कारणातून मामाने भाचेची हत्या केली. याप्रकरणी आरोपी मामाला पोलिसांनी अटक केली असून अर्जुन सोनी (वय २०) असं अटक केलेल्या आरोपी मामाचं नाव आहे.


१६ वर्षांची अल्पवयीन भाची वसईकडील वालीव परिसरात राहणारे तिचे मामा कृष्णा सोनी आणि अर्जुन सोनी यांना भेटण्यासाठी आली होती. मात्र, कोणालाही काहीही न सांगता शनिवारी ती घरातून निघून गेली. त्या दिवसापासून भाची बेपत्ता होती. तिच्या कुटुंबातील नातेवाईकांनी सर्वत्र तिचा शोध घेतला. मात्र, ती कुठेच सापडली नाही, त्यानंतर वालीव पोलीस ठाणे गाठत याप्रकरणी तिच्या मामीने तक्रार दाखल केली.आरोपी मामा अर्जुन सोनी हा १६ वर्षाच्या अल्पवयीन भाचीला घेऊन भाईंदर येथून विरार फास्ट लोकल ट्रेन पकडून निघाला होता. लोकल ट्रेन नायगाव - भाईंदर दरम्यान पोहोचल्यानंतर मामा अर्जुन याने भाचीला धावत्या लोकल ट्रेनमधून खाली ढकलून दिलं. यात १६ वर्षाच्या कोमलचा मृत्यू



झाला. यावेळी लोकल ट्रेनमधून प्रवास करत असलेल्या प्रवाशांनी अर्जुन सोनी याला पकडून रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिलं. रेल्वेतून पडून अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाल्यानं वसई रेल्वे पोलीस ठाण्यात याप्रकरणी अपघाताची नोंद करण्यात आली होती. या घटनेत मृत मुलगी वालीव पोलीस ठाणे हद्दीतून बेपत्ता झाल्यानं वालीव पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला. वालीव पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला असता धक्कादायक माहिती समोर आली आहे. आरोपी मामा अर्जुन सोनी आणि त्याची भाची यांचे वर्षभरापासून प्रेमसंबंध होते. भाची मामाशी लग्न करण्यास आग्रही होती. मात्र, मामाला हे लग्न करायचं नव्हतं. लग्नासाठी आग्रही असलेली भाची ओझं बनेल या कारणातून आरोपी मामा अर्जुन सोनी याने त्याच्या भाचीला धावत्या लोकल ट्रेनमधून खाली ढकलून तिची हत्या केली, अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप घुगे यांनी दिली.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!





# गौतम गंभीर यांचा अजून एक मोठा निर्णय, बुमराह आणि हार्दिक संघाबाहेर

**नवी दिल्ली :** भारताचा काही दिवसांपूर्वीच लाजीरवाणा पराभव झाला. त्यानंतर गौतम गंभीर यांच्यावर जोरदार टीका झाली. कारण गौतम गंभीर यांनी अशीच खेळपट्टीची मागितली होती. गौतम गंभीर यांचा निर्णय अंगलट आला, कारण भारताचा तिसऱ्याच दिवशी पराभव झाला. भारतासाठी ही मोठी नामुष्कीची वेळ होती. पण आता पुन्हा एकदा गौतम गंभीर यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. गौतम गंभीर यांनी आता जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पंड्या यांना संघाबाहेर करण्याचा निर्णय घेतला आहे. बुमराह आणि हार्दिक यांना संघाबाहेर का केलं जात आहे, याचे कारणही समोर आले आहे.जसप्रीत बुमराहने पहिल्या कसोटीत दमदार गोलंदाजी केली होती. जसप्रीत बुमराहने पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेचा अर्धा संघ गारद केला होता. त्यामुळेच भारताला त्यांना लवकर ऑल आऊट करता आले होते. त्यामुळे जसप्रीत बुमराह आता भन्नाट फॉर्मात असल्याचे समोर आले आहे. पण तरीही आता गौतम गंभीर यांनी जसप्रीत बुमराहला वनडे मालिकेमधून बाहेर ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे आता समोर येत आहे. जसप्रीत बुमराहला टी २० वर्ल्ड कपसाठी विश्रांती मिळाली, म्हणून त्याला वनडे संघामधून बाहेर काढणार असल्याचे कारण देण्यात आले आहे. त्यामुळे बुमराह आता भारताच्या वनडे मालिकेत दिसणार नाही.हार्दिक पंड्यालाही वनडे मालिकेत न खेळवण्याचा निर्णय गौतम गंभीर यांनी घेतला आहे. काही दिवसांपूर्वी हार्दिकला दुखापत झाली होती. त्याच्या मांडीचे दुखणे वाढले होते. त्यावर हार्दिक पंड्याने उपचार घेतले होते. या दुखापतीमधून हार्दिक पंड्या सावरला आहे. पण हार्दिकला एवढ्या लवकर संघात स्थान देणे धोक्याचे असेल आणि त्याला खेळवून कोणतीही जोखीम उचलायची नाही, असा गौतम गंभीर यांचा मानस आहे. त्यामुळे जसप्रीत बुमराहबरोबरच हार्दिक पंड्यालाही संघाबाहेर करण्यात येणार आहे. याबाबतची घोषणा काही दिवसांतच बीसीसीआय करणार असल्याचे म्हटले जात आहे.भारताचा वनडे मालिकेसाठीचा संघ काही दिवसांतच जाहीर करण्यात येणार आहे. त्यापूर्वी भारतीय संघांमधील सूत्रांनी ही माहिती दिली आहे.




## इंडिया आणि पाकिस्तान पुन्हा भिडणार ?

**कोलकाता :** आयसीसीने पुढील वर्षी होणाऱ्या अंडर-१९ पुरुष विश्वचषकाबाबत मोठी घोषणा केली आहे. जानेवारी आणि फेब्रुवारीत होणाऱ्या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान एकमेकांशी भिडण्याची शक्यता कमी आहे. स्पर्धेत १६ संघ आहेत, त्यांना चार ग्रुपमध्ये विभागलं आहे. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान संघाला वेगवेगळ्या ग्रुपमध्ये ठेवण्यात आलं आहे. त्यामुळे ग्रुप स्टेजमध्ये लढत होण्याची शक्यता कमी आहे.

पुढील वर्षी होणाऱ्या अंडर-१९ विश्वचषकाच्या स्पर्धेत दोन्ही संघ वेगवेगळ्या ग्रुपमध्ये असणार आहे. आयसीसीने बुधवारी १९ नोव्हेंबर रोजी अंडर-१९ विश्वचषकाच्या वेळापत्रकाची घोषणा केली. अंडर-१९ वनडे विश्वचषक स्पर्धेचा प्रारंभ १५ जानेवारी रोजी होईल. तर ६ फेब्रुवारी रोजी या स्पर्धेचा अंतिम सामना होईल.या स्पर्धेत



एकूण १६ संघ असणार आहेत. तर या १६ संघांना ४ ग्रुपमध्ये विभागण्यात आलं आहे. ५ वेळा विश्वचषक जिंकणाऱ्या टीम इंडियाला ग्रुप एमध्ये ठेवण्यात आलं आहे. या ग्रुपमध्ये टीम इंडियासहित न्यूझीलँड, बांगलादेश आणि अमेरिकेच्या संघाचा समावेश आहे. या स्पर्धेचा पहिला सामना झिम्बॉब्वेमधील मैदानात भारत आणि अमेरिकेमध्ये होणार आहे.

दुसरीकडे ग्रुप बीमध्ये पाकिस्तान, यजमान झिम्बॉब्वे, इंग्लंड, स्कॉटलँड या संघाचा समावेश आहे. सी ग्रुपमध्ये ऑस्ट्रेलिया, आयरलँड, जपान आणि श्रीलंकेचा समावेश आहे.

## पाकिस्तानची झिम्बाब्वेच्या कर्णधाराने लाज काढली

**दिल्ली :** पाकिस्तानचे खेळाडू आणि पत्रकार सध्याच्या घडीला भारतावर बहिष्कार घालत असल्याचे पाहायला मिळत आहे. भारताचं नाव न घेता मोठी वक्तव्य करणं हे त्यांचं सुरु आहे. पण यामध्ये त्यांचीच लगासमोर लाज गेली आहे. झिम्बाब्वेच्या कर्णधारानेच पाकिस्तानची जगासमोर लाज काढल्याचे समोर आले आहे. झिम्बाब्वेच्या कर्णधाराने एकाच वाक्यात आता कशी पाकिस्तानची कशी लाज गेली, याचा व्हिडिओ जगभरात व्हायरल झाला आहे.पाकिस्तानने आता तिरंगी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. यामध्ये झिम्बाब्वेचाही समावेश आहे. त्यामुळे झिम्बाब्वेचा संघ पाकिस्तानात दाखल झाला आहे. जेव्हा झिम्बाब्वेचा कर्णधार पत्रकार परिषदेसाठी आला तेव्हा त्याला पाकिस्तानच्या पत्रकारांनी एक प्रश्न विचारला. त्यामध्ये पाकिस्तानच्या पत्रकाराने भारताचे नाव घेतले नाही पण त्यांना आपल्या देशाची स्तुती ऐकायची होती. त्यामुळे त्यांनी तसाच एक प्रश्न विचारला. त्यावर




झिम्बाब्वेच्या कर्णधाराने त्यांची बोलतीच बंद करून टाकली. पाकस्तानच्या पत्रकारांनी झिम्बाब्वेचा पत्रकार सिकंदर रझाला विचारले की, 'आशिया खंडातील दुसरा सर्वोत्तम संघ कोणता आहे? आम्हाला हे जाणून घ्यायचे आहे की, तुमचा सामना आशियातील दुसऱ्या की तिसऱ्या सर्वोत्तम संघाशी होत आहे ? ' भारताचा उल्लेख न करता पाकिस्तानच्या पत्रकाराला आपल्या देशाचे नाव ऐकायचे होते, पण घडले मात्र वेगळेच.या प्रश्नावर सिकंदर रझाने म्हटले की, ' मी एका राष्ट्रीय संघाची जर्सी परीधान केली आहे. या देशाचे प्रतिनिधीत्व मी जगात करत आहे. मी फक्त तुम्हाला एकच गोष्ट सांगू शकतो आणि ती गोष्ट म्हणजे झिम्बाब्वेचा संघ हा आफ्रिका खंडातील दुसरा सर्वोत्तम संघ आहे. मला काहीच फरक नाही की, आशिया खंडात दुसरा सर्वोत्तम संघ कोणता आहे. सध्या माझे लक्ष हे संघावर केंद्रीत झालेले आहे. माझ्यासाठी झिम्बाब्वेचा संघ सर्वात महत्वाचा आहे. आशियात कोणता संघ पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहे, याचा मला काहीच फरक पडत नाही.

***



# गौतम गंभीर मैदानात जाऊन... रॉबिन उथप्पाने एकाच वाक्यात लगावली चपराक

**नवी दिल्ली :** भारताच्या लाजीरवाणाऱ्या पराभवानंतर सर्वच जण गौतम गंभीर यांना घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. कारण भारतावर फक्त तीन दिवसांतच पराभवाची नामुष्की ओढवली होती. त्यामध्येच गौतम गंभीर यांनी खेळपट्टी आपल्या मनासारखी बनवून घेतली होती आणि तो निर्णय चांगलाच अंगलट आला. सुनील गावस्करांपासून ते सौरव गांगुलीपर्यंत सर्वांनीच गौतम गंभीरवर तोफ डागली आहे. यामध्ये आता गंभीर यांचा जुना सहकारी रॉबिन उथप्पाने उडी घेतली आहे.गौतम गंभीर यांच्या कार्यकाळात भारतीय संघ १८ कसोटी सामने खेळला. या १८ कसोटी सामन्यांत भारताला ९ सामन्यांत पराभव पत्करावा लागला आहे. इडन गार्डन्सच्या खेळपट्टीवर तर भारताला फक्त १२४ धावाही करता आल्या नाहीत. आपल्या घरच्याच खेळपट्टीवर भारताच्या खेळाडूंचे वस्त्रहरण पाहायला मिळाले. गंभीर यांच्या खेळपट्टी बदलण्याच्या निर्णयामुळे हे सर्व घडल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे आता गौतम गंभीर यांच्यावर निशाणे साधले जात आहेत. रॉबिन उथप्पानेही आता गौतम गंभीरबाबत आपले मत व्यक्त केले आहे. गौतम गंभीर यांच्याबाबत रॉबिन उथप्पा म्हणाला की, ' प्रत्येक सामन्याचा निर्णय महत्वाचा ठरत असतो. कारण प्रत्येक सामना जिंकण्यासाठीच संघ मैदानात उतरत असतो. त्यामुळे प्रत्येक सामन्यात काय घडतं, ते सर्वांसाठी निर्णायक ठरत असतं. पहिल्या कसोटीत भारताचा मानहानीकारक पराभव झाला. त्यानंतर आता गौतम गंभीर यांच्यावर जोरदार टीका सुरु झाली आहे. भारताचा पराभव झाला ही गोष्ट खरी आहे, पण एक दिर्घकालीन गोष्टही महत्वाची असते. संघाची बांधणी करायला सर्वात जास्त वेळ जातो. सध्याच्या घडीला भारतीय संघात तीच गोष्ट सुरु झाली आहे. भारतीय संघ सामना गमावतो आणि प्रशिक्षकांवर तोफ डागली जाते, हे चुकीचे आहे. कारण प्रशिक्षकाचे काम हे मैदानात जाऊन खेळणे नसते, तर तो फक्त खेळाडूंना मार्गदर्शन करू शकतो. रणनिती आखू शकतो. गौतम गंभीर मैदानात जाऊन काय खेळतो का, या प्रश्नाचे उत्तर टीकाकारांनी द्यायला हवे. मैदानात जाऊन खेळणे हे खेळाडूंचे काम आहे. त्यामुळे मैदानात खेळाडू कशी कामगिरी करतात, हे सर्वात महत्वाचे आहे आणि त्यासाठी गौतम गंभीरला दोषी ठरवले जाऊ शकत नाही. 'रॉबिन उथप्पाने यावेळी गौतम गंभीर यांच्या टीकाकारांना एकाच वाक्यात चपराक लगावल्याचे समोर आले आहे.गौतम गंभीर यांच्यावर जोरदार टीका होत असताना रॉबिन उथप्पाने मात्र त्यांची बाजू घेतल्याचे समोर आले आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# घटस्फोटाच्या ४ वर्षांनी कीर्ति पुन्हा प्रेमात..



**मुंबई :** प्राइम व्हिडिओचा शो 'फोर मोअर शॉट्स प्लीज' पाहिला असेल तर अभिनेत्री कीर्ति कुल्हारी आणि अभिनेता राजीव सिद्धार्थ यांना निश्चितच ओळखत असाल. या शोचा पहिला सीझन २०१९ मध्ये आला होता आणि तेव्हापासून तो यशस्वी राहिला आहे. आतापर्यंत याचे ३ सीझन प्रदर्शित झाले आहेत. आता लवकरच चौथा सीझन प्रदर्शित होणार आहे. याचदरम्यान अभिनेत्री कीर्ति आणि राजीव सिद्धार्थ डेटिंग करत असल्याचे समोर आले आहे. कीर्ति आणि राजीवने रिलेशनशिपची अधिकृत घोषणा केलेली नाही.

कीर्तिने राजीवसोबतची छायाचित्रे शेअर केली आहेत. यात दोघेही एका कारमध्ये हात पकडून असल्याचे दिसून येते. याचबरोबर कीर्तिने आणखी एक छायाचित्र शेअर केले होते, ज्यात ती राजीवच्या खांद्यावर डोकं टेकून आराम करत असल्याचे दिसून आली होती. कीर्ति कुल्हारीने ४ वर्षांपूर्वी घटस्फोट घेतला होता. कीर्ति पुन्हा प्रेमात पडली असल्याने तिच्या चाहत्यांना आनंद झाला आहे. कीर्ति ही अभिनयनिपुण अभिनेत्री असल्याने तिच्या प्रोजेक्ट्स बद्दल नेहमीच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता असते.

# 'वाराणसी'तील प्रियांका, महेशबाबूचा लुक समोर





**मुंबई :** बॉलिवूड तसेच हॉलिवूडमध्ये स्वत:चे स्थान निर्माण करणारी प्रियांका चोप्रा लवकरच भारतीय चित्रपटसृष्टीत पुनरागमन करताना दिसून येणार आहे. दक्षिणेतील दिग्गज दिग्दर्शक एस.एस. राजामौली आणि अभिनेता महेश बाबू यांचा आगामी चित्रपट 'वाराणसी'त ती मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटातील महेश बाबू आणि प्रियांका चोप्राचा फर्स्ट लुक सादर करण्यात आला आहे. यात प्रियांका चोप्रा ही ॲक्शन अवतारात दिसून येत आहे. राजामौली यांच्या चित्रपटाद्वारे प्रियांका चोप्रा भारतीय चित्रपटसृष्टीत पुनरागमन करत आहे. पोस्टरमध्ये प्रियांका पिवळी साडी आणि हातात बंदुक धरून ॲक्शन अवतारात दिसून आली आहे. या चित्रपटात प्रियांका चोप्रा ही मंदाकिनी नावाची भूमिका साकारत आहे. तर महेश बाबू हा पोस्टरमध्ये एका बैलावर स्वार होत येत असल्याचे दिसून येत आहे. या चित्रपटात मल्याळी अभिनेता पृथ्वीराज सुकुमारन देखील मुख्य भूमिकेत आहे. एक नवा काळ सुरू होईल आणि मी भारतीय चित्रपटसृष्टीत परतेन, अशी अपेक्षा आहे. हा नवा प्रवास अविश्वसनीय असेल हे मला ठाऊक आहे असे उद्गार प्रियांका चोप्राने काढले आहेत. वाराणसी हा चित्रपट पुढील वर्षी जगभरात प्रदर्शित केला जाणार आहे.

# ऐश्वर्या राय बच्चन यांनी घेतला मोदींचा आशीर्वाद; व्हिडिओ होतोय व्हायरल






**मुंबई :** बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री, मिस वर्ल्ड आणि बच्चन कुटुंबाची सून ऐश्वर्या राय बच्चन या केवळ त्यांच्या सौंदर्यासाठी नाही तर त्यांच्या नम्र वागणूकीसाठीही प्रसिद्ध आहेत. म्हणूनच त्या जिथेही जातात, तिथे चर्चेचा विषय बनतात. आता पुन्हा एकदा असाच एक व्हिडिओ समोर आला आहे ज्याने नेटकऱ्यांची मनं जिंकली आहेत.

आंध्र प्रदेशातील पुट्टपर्थी येथे आध्यात्मिक गुरू श्री सत्य साईबाबा यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याच सोहळ्यात ऐश्वर्या राय बच्चन यांनीही हजेरी लावली होती. ऐश्वर्यांनी कार्यक्रमात संस्कार, अध्यात्म आणि मानवतेचे महत्त्व यावर सुंदर भाषण केले.

त्यांचे बोलणे ऐकून उपस्थित प्रेक्षकांनीही टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. भाषण संपल्यानंतर ऐश्वर्या थेट पीएम मोदींकडे गेल्या आणि त्यांच्या चरणांना स्पर्श करून अभिवादन केले. मोदी यांनीही स्मितहास्य करत त्यांना आशीर्वाद दिला. हा क्षण कॅमेऱ्यात कैद झाला आणि सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

नेटकऱ्यांनी ऐश्वर्याच्या नम्रतेचे मनापासून कौतुक केले आहे. एका युजरने लिहिले की, ङ्गमिस वर्ल्ड असूनही इतकी साधेपणा? यालाच म्हणतात संस्कार! दुसऱ्याने कमेंट केली की, भारतीय संस्कृती जगभर प्रसिद्ध करणाऱ्या ऐश्वर्या रायला सलाम. तर आणखी एकाने लिहिले की, ऐश्वर्या Grounded आहे म्हणूनच आजही लोकांच्या मनात आहे. ती फक्त सुंदर नाही, ती संस्कारही आहे!ङ्ग काहींनी तर हा व्हिडिओ 'इंडियन कल्चरचा प्राउड मोमेंट' म्हणत शेअर केला आहे.

अलिकडेच ऐश्वर्या राय यांनी पॅरिस फॅशन वीकमध्ये स्टायलिश वॉक करून प्रेक्षकांचे लक्ष वेधले होते. आणि आता पुट्टपर्थीमध्ये त्यांच्या कृतीने मनं जिंकली आहेत. एखाद्या कलाकारात ग्लॅमर आणि नम्रता हे दोन्ही असणे किती सुंदर दिसू शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे ऐश्वर्या राय.

# मुख्य डाकघरात अत्याधुनिक एटीएम सेवा नागरिकांसाठी सुरू

जनसंचलन/बुलढाणा

येथील मुख्य डाकघराच्या आवारात नव्याने अद्ययावत स्वरूपात पुनः सुरू करण्यात आलेल्या एटीएम सेवेचा शुभारंभ डाकघर विभागाचे अधीक्षक गणेश अंभोरे यांच्या हस्ते आज करण्यात आला. डाक विभागाच्या तसेच इतर सर्व बँकांच्या ग्राहकांना २४ ७ सेवा देणारे हे एटीएम आता नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध झाले आहे. या उद्घाटन प्रसंगी सहायक अधीक्षक कैलास तायडे, सहायक अधीक्षक सतीश निकम, बुलढाणा मुख्य डाकघराचे पोस्टमास्टर आशीष इंगळे तसेच आयपीपीबी बुलढाणा शाखेचे वरिष्ठ प्रबंधक हिमांशु धल, तसेच डाक विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डाक विभागाच्या ग्राहकांसह सर्वच बँकिंग ग्राहकांनी या अत्याधुनिक एटीएम सेवांचा लाभ घ्यावा. अशाच स्वरूपाची सेवा मुख्य डाकघर खामगाव येथेही सुरू करण्यात आली असून तेथील नागरिकांनीही या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश आभोरे यांनी केले.

पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार


हॅलो बुलडाणा

सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलढाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# शिक्षक पात्रता परीक्षा २३ नोव्हेंबरला बुलढाण्यात १८ केंद्रांवर ११ हजार २८३ परीक्षार्थी

जनसंचलन/बुलढाणा



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. जिल्ह्यातील १८ परीक्षा केंद्रांवर ११ हजार २८३ परीक्षार्थी परीक्षा देणार आहे. परिक्षेसाठी प्रशासन सज्ज असून शांततापूर्ण, पारदर्शक आणि आदर्श संचालन प्रक्रियेनुसार परीक्षा पार पाडण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

परीक्षेसाठी पेपर-१ साठी ५ हजार ३०८ तर पेपर २ साठी ५ हजार ९७५ परीक्षार्थी प्रविष्ट झाले आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून काटेकोर निरीक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रत्येक परीक्षार्थीची मेटल डिटेक्टरद्वारे फ्रिस्कींग करण्यात येणार असून मोबाईल, स्मार्ट वॉच, कॅल्क्युलेटर आदी इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर सक्त बंदी राहणार आहे. परीक्षार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक फ ॅस रिकग्निशन प्रणालीद्वारे नोंदवली जाणार असून, तांत्रिक कारणांसाठी पर्यायी प्रक्रिया केंद्र संचालकांच्या देखरेखीखाली राबवली जाईल. मुळ उमेदवाराऐवजी दुसऱ्या व्यक्तीने परीक्षेत प्रवेश केल्याचे आढळल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. एकाच उमेदवाराने विविध केंद्रांवर अनेक अर्ज भरल्यास त्याची पूर्वतपासणी पूर्ण करण्यात आली आहे. राज्यातील सर्व परीक्षा केंद्रे परीक्षा परिषद आणि संनियंत्रण कक्षाशी हॉटलाइनद्वारे जोडण्यात आली आहेत. संपूर्ण परीक्षेच्या कालावधीत जिल्हा व राज्य पातळीवरून सीसीटीव्हीद्वारे थेट निगरानी ठेवण्यात येणार आहे. दरम्यान, परीक्षेसंबंधी कोणत्याही अफवा अथवा चुकीच्या माहितीवर विश्वास न ठेवता फक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावरील सुचनांचेच अनुसरण करावे, असे आवाहन परिषदेतर्फे करण्यात आले आहे. परीक्षापूर्वी परीक्षार्थ्यास कोणतीही अडचण उद्भवल्यास जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या प्राथमिक शिक्षण विभागात स्थापन करण्यात आलेल्या मदत कक्षाशी संपर्क साधावा, असे प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी कळविले आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अनुदानासाठी ई-केवायसी अनिवार्य

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यामध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात शासन स्तरावरून केंद्रभूत पद्धतीने थेट लाभार्थी हस्तांतरण() प्रणालीमार्फत अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, अनेक पात्र शेतकरी लाभार्थ्यांनी आपले ई-केवायसी पूर्ण न केल्यामुळे त्यांचे अनुदान वितरित होऊ शकलेले नाही. अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरू असून, ई-केवायसी पूर्ण झाल्यानंतरच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा केली जाणार आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी तातडीने जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन आपले ई-केवायसी पूर्ण करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

वृत्त विश्वातील ढाण्या वाघ 'हॅलो बुलढाणा!'
सत्याचा स्वीकार,भ्रष्टाचारी शिकार!
लोकसेवेचे व्रत,वाचकांचे भरभरून मत!
निःपक्ष,निर्भिड, तडफदार..
लोकसेवेचा कर्णधार!
'हॅलो बुलढाणा!'

City News
हॅलो बुलडाणा
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
HELLO BULDANA.COM

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाण्याच्या डिफेंडरची खरी कथा काय ?

# शहरात चर्चेची धग! वसीम शेख यांनी उघड केलं डिफेंडर रहस्य

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा जोर वाढत असतानाच बुलढाण्यात राजकीय तापमान अचानक उसळले आहे.शहरातील विकासा वरून काँग्रेसच्या नगरसेवक पदाचे उमेदवार वसीम शेख यांनी सरळ आमदार संजय गायकवाडांवर थेट निशाणा साधत प्रहारांचा तगडा मारा केला आहे. शहरात सध्या चर्चेचा विषय ठरलेल्या डिफेंडर गाडी प्रकरणावरून वसीम शेख यांनी आमदारांना माध्यमांसमोर चव्हाट्यावर आणले आहे. झालं ते सर्वांना माहिती आहे, सर्वश्रुत आहे! कोणाचा विकास झाला? कुणाकडे डिफेंडर आली? जर ती ठेकेदाराच्या नावावर होती तर त्या गाडीवर चा सिम्बॉल कस काय? असा थेट सवाल वसीम शेख यांनी उपस्थित केला. यासोबतच आमदारांच्या स्टिकरसाठी नियम आहेत. इतके आमदार बघितले, पण कोणालाही स्टिकर गाडीवर



लावताना पाहिलं नाही. मी स्वतः गायकवाडांना याबाबत प्रश्न विचारला होता,असा दावा करत शेख यांनी वातावरणात खळबळ उडवली. स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या विकासाच्या चर्चेवरही त्यांनी घणाघाती प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विकास कोणाचा आणि किती झाला, हे आता जनता स्पष्टपणे पाहते आहे,असा टोला लगावत त्यांनी आमदार गायकवाडांना सरळ आव्हान दिले. दरम्यान, नगरपालिका निवडणुकीच्या मोहीमेला जोर आल्यानंतर उमेदवारांचे मोर्चे, प्रचारयात्रा आणि घरदारी संपर्क मोहीम वेग पकडू लागल्या आहेत. थंडी असूनही राजकीय तापमान मात्र प्रचंड वाढले आहे.



वसीम शेख यांच्या या आक्रमक हल्ल्यामुळे गायकवाड समर्थक आणि विरोधकांमध्ये चर्चांचा भडका उडाला असून बुलढाण्यातील निवडणूक आणखी रंगतदार होणार हे स्पष्ट झाले आहे.






## अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गावांमध्ये भुरट्या चोरट्यांचा सुळसुळाट !

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अंत्री खेडेकर येथील शेतकरी एकनाथ माळेकर यांच्या अंत्री शिवारातील गट नंबर ५७ मध्ये दोन हेक्टर जमीन असून सदर शेतीमध्ये यावर्षी मक्याचे पिक घेतले आहे. दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास शेतकऱ्याने मकाच्या शेतामध्ये स्पिंकलर लावून ठेवले होते.सायंकाळी साडेसहा वाजता घरी गेले. दिनांक २० नोव्हेंबर रोजी सकाळी ६:00 वाजेच्या सुमारास शेतामध्ये गेले असतांना पाणी उडताना दिसले. यावरून शेतकऱ्याने विहिरीवर जाऊन मोटर पंप बंद करून शेतामध्ये गेले असता, लावलेल्या कावेरी, जिंदाल व जैन कंपनीच्या १६ तोट्या त्यांना दिसून आल्या नाही. यावरून त्यांच्या शेतातील कावेरी ,जिंदाल व जैन कंपनीच्या १६ तोट्या प्रत्येकी नग ८५0 रुपये प्रमाणे किंमत १३६00 रुपये अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची त्या शेतकऱ्यांनी तक्रार अंढेरा पोलीस स्टेशनला दिली आहे.या शेतात सुरू असलेल्या तुषार संचाने पाणी देण्याच्या स्प्रिंकलरच्या तोट्या चोरट्यांनी रातोरात लंपास केल्याने अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांच्यासमोर आव्हान उभे केले आहे. रात्रीतून जवळपास १६ तोट्या चोरट्याने लंपास केल्या आहेत .त्यामुळे आधीच विजेच्या लपंडावाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. स्पिंकलरच्या तोट्या चोरणाऱ्या चोरट्यांचा पोलिसांनी ताबडतोब बंदोबस्त करावा अशी मागणी ऐरणीवर आली आहे. अंढेरा पोलीस स्टेशन पासून अवघ्या दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर असलेल्या मेरा खुर्द, मेरा बुद्रुक,गुंजाळा ,मनुबाई या गावांमध्ये सध्या शेती पेरणीचे काम सुरू आहे व शेतीला पाणी देण्याचे काम सुद्धा सुरू आहे. या तोट्या चोरीमुळे एकच खळबळ अंत्री खेडेकर, मेरा बुद्रुक सह परिसरात तील गावामध्ये उडाली आहे. आधीच शेतकरी अस्मानी आणि सुलतानी संकटाशी लढत असतानाच चोरट्यांनी चोरीचा धुमाकूळ घातल्यामुळे शेतकऱ्यावर खूप मोठे संकट कोसळले आहे.